**सं.फौ.ख.क्र.१८३/२०२२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३**

**निशाणी क्र. ७ लगत**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – श्री. सचिन अशोक मदने

**वय** – ३४ वर्षे, **धंदा** – शेती

**राहणार** – कुडाळ,ता.जावली, जि. सातारा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे</u>**

१. मी कुडाळ येथे पत्नी कोमल, आई शोभा, वडील अशोक, भाऊ संदिप, वहिणी स्वाती, पुतणी श्रिया,

कुडाळमध्ये माझे घर आहे व माझी शेती गाळवंड याठिकाणी आहे. मी शेती करतो. दि.२६.१२.२०२१ रोजी गाळवंड येथील आमच्या शेतात सकाळी ११ वाजता शेत भिजवण्यासाठी गेलो होतो. साधारण ०४:१५ वाजताच्या आसपास गाडीच्या जोरात धडकण्याचा आवाज आला. आवाज आल्यामुळे मी शेतातील काम तसेच टाकून कॅनलवर ॲक्सीडेंट झाला तेथे मी पोहोचलो. अपघात ठिकाणापासून १०० मीटर अंतरावर माझे शेत आहे. त्याठिकाणी सीडी डॉन आणि युनिकॉर्न या दोन गाडया पडलेल्या होत्या. सीडी डॉनचा नंबर एमएच १२ बीएन ५७८०. अपघात झाला तो रस्ता उत्तर दक्षिण असा आहे. गाडया त्या रस्त्याच्या पूर्वेला पडलेल्या होत्या. दुसरी गाडी युनिकॉर्न तिचा क्रमांक एमएच १४ डीके ८१०२ हा होता. सीडी डॉन ही पुढे पडली होती व युनिकॉर्न पाठीमागे पडली होती. आमच्या गावातील महेंद्र शिंदे हे रस्त्यावर पडले होते. त्यांच्या डोक्यातून व कानातून रक्त येत होते, तसेच उजव्या पायाला व डाव्या खांद्याला जखम झाल्या होत्या. त्याठिकाणी ७–८–१० माणसे होती. त्यापैकी महेंद्र खटावकर हे तेथेच होते. तेथे आम्ही गाडी शोधण्याचा प्रयत्न केला. त्याठिकाणी राजदिप भालेघरे यांची एर्टिगा होती. त्या गाडीमध्ये आम्ही महेंद्र शिंदे यांना बसवले. कुडाळ येथील सदानंद हॉस्पिटलमध्ये आम्ही त्यांना दाखवले. त्यानंतर मी माझ्या

कामावर रानात आलो. घटनेसंदर्भात पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. त्यानंतर मला असे कळाले की, महेंद्र शिंदे यांना साताराला हलवले व सातारा येथून पुणे येथे सहयाद्री हॉस्पिटलला उपचारासाठी हलवल्याचे मला समजले. त्यावेळी मला असे समजले की, महेंद्र शिंदे यांना युनिकॉर्न या गाडीने पाठीमागून धडक दिलेली आहे. ती गाडी प्रशांत अशोक तरडे चालवत होते हे मला लोकांकडून समजले. मी अपघात स्थळावर गेलो तेव्हा अपघात घडवणारे इसम त्याठिकाणी होते. त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. ते कोर्टात आजरोजी हजर नाहीत.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एच.आर.शिंदे यांचेमार्फत उलटतपास सुरु</u>**

२. माझ्या शेतामध्ये माझा गोठा आहे. बामणोली ते कुडाळ या रस्त्यावर मेन रोडपासून उत्तरेला ५०० मीटरवर माझा गोठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.२६.१२.२०२१ ते दि.०५.०२.२०२२ पर्यंत मी कुडाळमध्येच होतो. हे म्हणणे खरे नाही की, दीड ते दोन महिन्यांच्या दरम्यान मी पोलीस स्टेशनला गेलो नाही व पोलीसांनी मला बोलावले नाही.

प्रश्न – त्यावेळी पोलीसांनी तुमचा जबाब नोंदवला का ?

उत्तर – त्यांनी काय घडले ते माझ्याकडून लिहून घेतले होते.

मी माझा जबाब दि.०५.०२.२०२२ रोजी दिला का ते आता मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना माझे शेत घटनास्थळापासून १०० मीटर अंतरावर आहे हे सांगितले नव्हते. ते मी आजरोजी प्रथमतःच सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही गाडया रस्त्याच्या पूर्व बाजूला पडल्या होत्या हे मी पोलीसांना सांगितले नव्हते. मी जबाब देताना महेंद्र शिंदे हे रस्त्यावर पडले होते व त्यांच्या डोक्यातून रक्त येत होते हे पोलीसांना जबाब देताना सांगितले होते. ते माझ्या जबाबात का नमूद केले नाही त्याचे कारण मी सांगू शकत नाही. आम्ही घटनास्थळावर गाडी शोधली हे पोलीसांना सांगितले होते, ते माझ्या जबाबात का लिहिले नाही ते मी सांगू शकत नाही. जबाब देताना मी पोलीसांना सांगितले नव्हते की, अपघात घडवणारा इसम मी जेव्हा अपघातस्थळावर गेलो तेव्हा त्याठिकाणी होता.

हे म्हणणे खरे नाही की, ०४ ते ०४:१५ वाजताच्या दरम्यान मला गाडी धडकल्याचा आवाज आला व मी घटनास्थळी पोहोचलो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात रस्ता हा उत्तर दक्षिण असून गाडीचा क्र.एमएच १४ डीके ८१०२ हा होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, महेंद्र शिंदे खाली पडले होते, हाता पायाला, डोक्याला लागले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली होती, त्यानंतर महेंद्र शिंदे यांना सातार्‍याहून पुण्याचा उपचाराकरीता हलवले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रशांत तरडे हा सदरची गाडी चालवत होता व त्याने महेंद्र शिंदे यांना पाठीमागून धडक दिली असे मला लोकांकडून समजले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

ठिकाण : मेढा

रविंद्र भ. खवले,

दि. ०२.११.२०२३

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**

**सं.फौ.ख.क्र.१८३/२०२२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२**

**निशाणी क्र. ७ लगत**

शपथेवर कथन करतो की,

**नांव** – श्री. अशपाक सिराज शेख

**वय** – ४१ वर्षे, **धंदा** – चिकन व्यवसाय / शेती

**राहणार** – मु.पो. सरताळे,ता.जावली, जि. सातारा

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.जे.आर.इंगळे</u>**

१. दि.०४.०२.२०२२ रोजी मेढा पोलीसांनी मला कुडाळ पाचगणी रोडवर शेते कॅनॉल पुल येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. बोलावल्यानंतर मी तेथे गेलो. त्यावेळी माझ्यासोबत निलेश त्रिंबक नवले हे दुसरे पंच हजर होते. तेथे पोलीस, आम्ही होतो. घटनास्थळ आम्हाला महेंद्र दत्ताजीराव शिंदे यांनी दाखवले. त्यांनी गाडीचा तेथे अपघात झाला होता असे सांगितले व रस्त्यापासून गाडी कच्च्या रस्त्याला उजव्या बाजूला पडली होती असे सांगितले. सदरचे ठिकाण हे धोम उजवा कालवा रस्त्याच्या कच्चया बाजूला पूर्वला होते. त्याठिकाणी पाठीमागून गाडी येवून त्यांना धडकली असे त्यांनी सांगितले. रस्ता १५ ते १७ फुट दरम्यानचा असेल. मोठा रस्ता होता. कच्चा रस्ता होता व तो शेते या गावाला जाणारा होता. त्याठिकाणी काही जप्त केले नव्हते. पूर्वेला बाळू भगवान भिलारे यांची शेतजमीन, डांबराच्या पलीकडे भिलारे गुरुजी यांची जमीन. मला दिशा व्यवस्थित सांगता येणार नाहीत. पोलीसांनी मोजमापं टाकली, ती जागा पाहिली. पंचनामा केला व आमच्या सहया घेतल्या. आम्ही त्यावर वाचून सहया केल्या. त्याच्याअगोदर काहीही केलेले नव्हते. पंचनामा अंदाजे ५ वाजता सुरु झाला व ०५:३० च्या दरम्यान संपला. आता मला सदरचा पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अ.क्र.२ वर माझी सही आहे. पंचनाम्यात लिहिले आहे ते खरे लिहिलेले आहे. सदरील **पंचनाम्यास निशाणी क्र.१७** देण्यात येत आहे. घटनास्थळाचा पंचनामा करताना आणखी काही केले नाही. तेथून आम्ही कुडाळ पोलीस स्टेशनला गेलो. तेथे पोलीस

स्टेशनच्या आवारात गाडया होत्या त्या दाखवल्या. एक पांढऱ्या रंगाची युनिकॉर्न क्र.एमएच–१४–डीके–८१०२ ही गाडी पाहिली. सदरची गाडी ही पुढे थोडी डॅमेज झाली होती. ही गाडी जास्त डॅमेज झाली नव्हती. त्यानंतर मी दुसरी गाडी सीडी डॉन एमएच–१२–बीएल–५७८० काळा रंग ही पाहिली. सदर गाडीचे पाठीमागील इंडिकेटर तुटलेले होते, नंबर प्लेट चेपलेली होती व पाठीमागचं चाक थोडेसे वाकडे झाले होते. सदर गाडीचे एक इंडिकेटर लोंबकळत होते व एक इंडिकेटर नव्हतेच. त्या गाडीचे तीन एक हजार रुपयांचे नुकसान झाले होते. पांढऱ्या गाडीचे हजार एक रुपयांचे नुकसान झाले असले. पाहणी केली व पंचनाम्यावर सहया केल्या व निघून गेलो. आता मला वर नमूद दोन्ही गाडयाचे वाहन पाहणी पंचनामे दाखवण्यात आले. त्यावर माझ्या अ.क्र.२ वर सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरील **वाहन पाहणी पंचनाम्यांस अनुक्रमे निशाणी क्र.१८ व १९** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एच.आर.शिंदे यांचेमार्फत उलटतपास सुरु**

२. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी फोन करुन दुपारी ०४:३० वाजताच्या दरम्यान बोलावले होते. मला पोलीसांनी जेव्हा बोलावले तेव्हा मी सरताळे गावात होतो. सरताळे गाव हे कुडाळपासून पूर्वेस ३ किलोमीटर अंतरावर आहे. शेते हे गाव कुडाळच्या पश्चिमेला २ किलोमीटर अंतरावर आहे. निलेश नवले यांना मी लहानपणापासून ओळखतो. मी महेंद्र शिंदे यांना ओळखतो, ते कुडाळचे आहेत. मी गेली २० ते २२ वर्षांपासून त्यांना ओळखत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेते पुलाच्या येथे आजूबाजूला लोकांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गाडी उजव्या बाजूला पडली होती, सदरचे ठिकाण हे धोम कालव्याच्या कच्चया बाजूला पूर्वेला आहे हा मजकूर पंचनाम्यात नमूद नाही. पोलीसांनी सदरचा मजकूर पंचनाम्यात का लिहिला नाही हे मला सांगता येणार नाही. कुडाळ ते पाचगणी रस्ता हा पूर्व पश्चिम आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेते कॅनॉल हा त्या रस्त्याला छेद करुन जातो. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याच्या कडेला झाडी वाढलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोजमाप हा शब्द पंचनाम्यात लिहिलेला नाही. महेंद्र शिंदेंचा अपघात झाला याची मला माहिती कळली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी बऱ्याच मॅटरमध्ये पंच म्हणून काम केलेले आहे. हे म्हणणे

खरे आहे की, पोलीस स्टेशनला ज्या गाडयांचा पंचनामा केला त्या गाडया पोलीस स्टेशनला कोणी आणून लावल्या, कधी लावल्या, कधीपासून उभ्या आहेत ते मला माहित नाही. कुडाळ मेढा हे १८ किलोमीटरचे अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, एमएच–१४–डीके–८१०२ ही गाडी पुढे थोडी डॅमेज झाली होती, तिचे जास्त नुकसान झाले नव्हते, तिचे एक हजार रुपयांचे नुकसान झाले होते हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सीडी डॉन एमएच–१२–बीएल–५७८० काळा रंग ही पाहिली. सदर गाडीचे पाठीमागील इंडिकेटर तुटलेले होते, नंबर प्लेट चेपलेली होती व पाठीमागचं चाक थोडेसे वाकडे झाले होते. सदर गाडीचे एक इंडिकेटर लोंबकळत होते व एक इंडिकेटर नव्हतेच. त्या गाडीचे तीन एक हजार रुपयांचे नुकसान झाले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर पंचनामा केला, सहया केल्या हे मी खोटे सांगत आहे. मी गावचा काही काळ सरपंच असल्यामुळे पोलीसांबरोबर माझी ओळख होती, त्यामुळे माझा नंबर पोलीसांकडे होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचा पंचनामा केला नाही, गाडीची पाहणी केली नाही, आम्ही पोलीस स्टेशनला बसून कागदपत्र तयार केली. हे म्हणणे खरे नाही की, महेंद्र शिंदे हे माझे मित्र असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/–

ठिकाण : मेढा

दि. ०२.११.२०२३

रविंद्र भ. खवले,

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मेढा.**